पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७७/२०१९
दिनांक : २२/०२/२०१९

प्रति,

मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **२७/०२/२०१९** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२७/०२/२०१९** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८**

**दिनांक : २७/०२/२०१९** **वेळ : दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **२७/०२/२०१९** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत महराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम १९७१(सुधारणा,पुर्नवसन व पुर्नविकास इ.) नुसार संरक्षणपात्र झोपडीधारक यांना JNNURM/BSUP अंतर्गत सदनिका वाटप करणेत येतात त्याचप्रमाणे चिखली प्राधिकरण से.नं.१७ व १९ मध्ये EWS धारकांसाठी पात्रता व अटी शर्तीनुसार म्हाडा आरक्षण प्रमाणे सदर सदनिका वाटप करणेत येतात. तथापि अनाथ असणारे पती/पत्नी हे समाजाचे घटक असताना त्यांना BSUP अंतर्गत सदनिका देणेसंबंधी कोणतेही धोरण निश्चीत नाही. मनपा BSUP विभाग मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाने महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक-२/४/२०१८ अन्वये अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता शिक्षण व नोकरी यामध्ये खुल्या प्रवर्गातुन १% समांतर आरक्षण लागु करणेस मान्यता दिली आहे. यास्तव पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत अनाथ असणारे पती/पत्नी यांचेकरीता महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक २/४/२०१८ नुसारचे धर्तीवर अनाथ पती/पत्नी यांना BSUP अंतर्गत मनपामार्फत सदनिका वाटप संबंधीचे खालील अटी शर्तीनुसारचे धोरण मा.महापालिका सभा मान्यतेनुसार धोरण निश्चीत करणे आवश्यक आहे.

१) महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक-२/४/२०१८ नुसार व वेळोवेळी शासनाचे यासंबंधी निर्गमीत होणारे शासन निर्णयानुसार BSUP अंतर्गत उपलब्ध असणारे सदनिकामध्ये अनाथ पती/पत्नी यांना खुल्या प्रवर्गातुन १% रक्कम समांतर आरक्षण ठेवणेत येईल.

२) महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.संदर्भ २०१३/प्र.क्र.१०९/य३ दि.  /६/२०१३ नुसार अनाथ असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

३) अनाथ असणा-या पती किंवा पत्नी यांचे पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत कमीत कमी तीन वर्ष वास्तव्य असणे आवश्यक आहे. भाडयाने राहत असलेस नोंदणीकृत भाडेकरार(लिव्ह ॲन्ड लायसन्स) आवश्यक आहे.

४) शासनाचे व पिंपरी चिंचवड मनपा योजनाअंतर्गत सदनिका मिळालेली नसावी.(हरकत घेतलेली नसावी) तसेच पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत घर/जागा/सदनिका नसावी. याबाबत प्रतिज्ञापत्र आवश्यक असेल.

५) मनपाचे सदनिका उपलब्ध नसलेस अनाथ पती/पत्नी यांना सदनिका उपलब्ध करुन देणेसंबंधी मनपावर कोणतेही बंधन असणार नाही.

६) मनपा निश्चीत करतील त्या सदनिका किमतीच्या प्रमाणात(GST लागु असल्यास त्यासह) नियमानुसारची स्वहिस्सा रक्कम खुला प्रवर्गनुसार भरणे आवश्यक राहील.

७) अनाथ पती/पत्नी यांचे मतदार यादीत नाव असणे आवश्यक असेल तसेच रेशन कार्ड,पॅनकॉर्ड, आधार कार्ड आवश्यक असेल.

८) रहिवासी दाखला आवश्यक असेल.

९) मा.आयुक्त वेळोवेळी निश्चीत करतील त्या अटी/शर्ती बंधनकारक असतील तसेच सदर धोरणानुसार पात्र करणे सदनिका वाटप करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील आणि कोणतीही अटी/शर्ती,शासन निर्णय तरतुदींचा भंग केलेस दिलेली सदनिका कोणतेही कारण न देता रद्द करणे,स्वहिस्सा रक्कम जप्त करुन मनपा कोषागारात जमा करुन घेणेत येईल व त्यासंबंधीचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना असतील.

मनपा हददीतील श्री.सुजीत कुमार नाईक हेपती/पत्नी अनाथ असुन त्यांनीही BSUP अंतर्गत विशेष बाब म्हणुन सदनिका मिळणेस शासनास विनंती अर्ज केला होता. शासन नगर विकास विभाग यानी पत्र क्र.पीसीसी -३०१८/ प्र.क्र.२७८ /नवि-२२, दिनांक १२/११/२०१८ नुसार मनपा सभा मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करावी असे कळविले आहे. त्याप्रमाणे वरील प्रमाणे धोरण निश्चीत झालेनंतर श्री. सुजीत कुमार नाईक यांना BSUP अंतर्गत नियमानुसार सदनिका देणेत येईल. तरी वरील प्रमाणेचे अनाथ पती/पत्नी यांनाBSUP अंतर्गत सदनिका देणेकामीचे धोरण निश्चीती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७७/२०१९
दिनांक : २२/०२/२०१९ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.